पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. फ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक – ७
सभावृत्तांत

दिनांक – ०५/०२/२०१८ वेळ : स. ११.३०

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक ०५/०२/२०१८ रोजी स. ११.३० वा. फ प्रभाग कार्यालयाचे राजर्षी शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. साधना अंकुश मळेकर | सभापती |
| २. मा. कुंदन अंबादास गायकवाड | सदस्य |
| ३. मा.अश्विनी चिंचा बोबडे | सदस्य |
| ४. मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे | सदस्य |
| ५. मा. संगीता (नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्य |
| ६. मा. उत्तम प्रकाश केंदळे | सदस्य |
| ७. मा. पवळे सुमनताई मधुकर | सदस्य |

याशिवाय खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते

श्रीमती प्रभावती गाडेकर, प्रशासन अधिकारी, श्री सतीश इंगळे, कार्यकारी अभियंता (स्था.), श्री विशाल कांबळे, कार्यकारी अभियंता (पापु.), श्री प्रविण घोडे, कार्यकारी अभियंता, श्री शहाजी गायकवाड, उपअभियंता (स्था.), श्री राजेंद्र राणे, उपअभियंता, (स्था), श्री सतिश वाघमारे, उपअभियंता (स्था), श्री किशोर महाजन, अपअभियंता (पापु) श्री संजय तुपसाखरे, उपअभियंता (पापु.),श्री हनुमंत शिंदे उपअभियंता (जनि.), श्री मोहन खोंद्रे,उपअभियंता (झोनिपु), श्री शिर्के धाकोजी, सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री मोहन निकम, लेखाधिकारी, श्री सुरेश घोडे, उद्यान सहायक, श्री गुजराथी एम बी, कार्यालयीन अधिक्षक हे उपस्थित होते.

मा.साधना अंकुश मळेकर यांनी उपस्थिताचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली

अ. कार्यपत्रिका क्र.६ दिनांक – ०१/०१/२०१८ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे. असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

मा. सभापती व उपस्थीत सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले.

विषय क्र. १ - तळवडे येथील अग्निशामक केंद्रास कै. नामदेव बाळा भालेकर अग्निशामक केंद्र असे नामकरण करणे.
( दिनांक ०५/०२/२०१८ चे सभेमध्ये घेणेचे निर्णया प्रमाणे )

विषय क्र.२ पाणीपुरवठा विभागाकडील पत्र क्रमांक फ्क्षेका/पापु/काबि/१७२/२०१८ दिनांक ३०/०१/२०१८
पाणीपुरवठा विभागासाठी जनरेटर इंधन खरेदी या लेखाशिर्षावर सन २०१७-१८ मध्ये ५,००,०००/- तरतुद करण्यात आलेली होती. सदर तरतुदीमधुन जानेवारी २०१८ अखेर रु. रु. ४,९९,०००/- खर्च झालेला असुन माहे मार्च २०१८ पर्यंत जनरेटर वाहन इंधन साठी तरतुद उपलब्ध करुन देणे आवश्यक असलेमुळे पाणीपुरवठा विभागाकडील स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरील शिल्लक तरतुद रु. २,६०,००,०००/- मधुन रु. २,५०,०००/- जनरेटर वाहन इंधन या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणेबाबत विचार करणे.

---

(कृपया मागे पहा)

विषय क्र - १
दिनांक - ०५/०२/२०१८
सुचक - मा.पंकज दत्तात्रय भालेकर
सुचक - मा.संगीता प्रभाकर ताम्हाणे

ठराव क्र. - ११
विभाग – -
अनुमोदक – मा.प्रविण महादेव भालेकर
अनुमोदक – मा. पौर्णिमा रविंद्र सोनवणे

तळवडे येथील अग्निशामक केंद्रास कै. नामदेव बाळा भालेकर अग्निशामक केंद्र असे नामकरण करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

विषय क्र - २
दिनांक - ०५/०२/२०१८
सुचक - मा. मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

ठराव क्र. -१२
विभाग – पाणीपुरवठा विभाग
अनुमोदक – अश्विनी चिंधा बोबडे

पाणीपुरवठा विभागासाठी जनरेटर इंधन खरेदी या लेखाशिर्षावर सन २०१७-१८ मध्ये ५,००,०००/- तरतुद करण्यात आलेली होती. सदर तरतुदीमधुन जानेवारी २०१८ अखेर रु. रु. ४,९९,०००/- खर्च झालेला असुन माहे मार्च २०१८ पर्यंत जनरेटर वाहन इंधन साठी तरतुद उपलब्ध करुन देणे आवश्यक असलेमुळे पाणीपुरवठा विभागाकडील स्थापी अस्थापना या लेखाशिर्षावरील शिल्लक तरतुद रु.रु. २,६०,००,०००/- मधुन रु.रु. २,५०,०००/- जनरेटर वाहन इंधन या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणेबाबत विचार करणे. ठराव कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(साधना अंकुश मळेकर)
सभापती
फ प्रभाग समिती ,निगडी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/१६१ /२०१८
दिनांक- ०६ /०२ /२०१८

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव ( सभाशाखा )

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.